# ॲसिडिटी आणि होमिओपॅथी



होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम

'पित्त वाढणे', 'पित्त उसळणे', 'मला पित्ताचा खूप त्रास होतो' अशी बरीच संबोधने ॲसिडिटीसाठी वापरण्यात येतात. जसजशी माणसाची प्रगती होत गेली तसतसा हा पित्ताचा त्रास वाढू लागला. याला कारण म्हणजे बदललेली जीवनशैली आणि वाढलेला ताणतणाव.

ताण म्हणजे काय? तर अचानक निर्माण झालेली प्रतिकूल परिस्थिती; जिला एकतर सामोरे जाणे किंवा त्या परिस्थितीतून पायवाट काढणे. ताणाला दिला जाणारा हा प्रतिसाद शारीरिक व मानसिक दोन्ही बाजूंनी असतो. ताण निर्माण झाल्यानंतर मेंदूतील हायपोथॅलॅमस भागामधून हार्मोन स्रवला जातो. ज्याद्वारे आतड्यांच्या हालचाली वाढतात तर जठराच्या मंदावतात. परिणामी अन्न बराच काळ पोटात राहिल्याने जास्त प्रमाणात ॲसिड तयार होते. खाल्ले अन्न पचत नाही. जठरात श्लेष्म कमी प्रमाणात स्रवल्यामुळे जठराला ॲसिडमुळे दाह निर्माण होतो व कालांतराने अल्सर निर्माण होतो. यावरून तुमच्या लक्षात येईल की पटकन ताण घेण्याचा स्वभाव असलेल्या व्यक्तींमध्ये ॲसिडिटीचे प्रमाण जास्त असते. त्याचबरोबर ही लक्षणे गंभीर आजाराची संकेतचिन्हेदेखीलही असू शकतात.

निरोगी व्यक्तीच्या शरीरात जठरातील परायटल पेशींमार्फत गॅस्ट्रिक ॲसिड तयार केले जाते. हे गॅस्ट्रिक ॲसिड हायड्रोक्लोरिक ॲसिड, पोटॅशिअम क्लोराइड व सोडिअम क्लोराइड यांनी बनलेले असते. भूक लागल्यानंतर किंवा अन्नाच्या वासाने, चवीने जवळजवळ ३० टक्के ॲसिड जठरात मेंदूद्वारे चेतापेशींमार्फत जठराला मिळालेल्या सिग्नलमुळे तयार होते. या चेतापेशींमुळे जठरातील अंतःस्थ पेशींना हिस्टॅमिन व हायड्रोक्लोरिक ॲसिड स्रवण्याचा इशारा दिला जातो.

अन्न ज्या वेळेस उदरात येते त्या वेळेस वाढलेल्या आकारमानामुळे आणखीन ॲसिड तयार करण्याचा इशारा दिला जातो. जठरात या ॲसिडमुळे प्रथिनांचे बारीक घटकांत विघटन होते. त्याचबरोबर जंतुसंसर्ग रोखण्यास मदत होते. वाढलेले ॲसिड क्षमवण्याकरिता जठरात सोडिअम बायकाबोर्नेट व श्लेष्मदेखील स्रवले जाते.

उरलेले १० टक्के ॲसिड हे लहान आतड्याच्या पहिल्या भागात स्रवले जाते. या लहान आतड्यात मोठ्या प्रमाणात सोडिअम बायकाबोर्नेट स्रवले गेल्यामुळे ॲसिडिटी क्षमवली जाते.

यावरून तुमच्या लक्षात येईल की गॅस्ट्रिक ॲसिड हा अन्नपचन संस्थेचा महत्त्वाचा पाचक रस आहे. ज्यामुळे अन्नाचे चयापचयन तर होतेच, परंतु ते निर्जंतुकीकरणाचेदेखील कार्य करते. त्यामुळेच अतिप्रमाणात सतत ॲसिडिटीवर विरोधी औषधांचा उपचार केल्यामुळे हेलिकोबॅक्टर पायलोटी या जिवाणूंचा संसर्ग होतो ज्यामुळे अन्न वेळेवर पचत नाही. परिणामी पोट फुगणे, छातीत जळजळ होणे, ढेकर येणे, मळमळ होणे, पोट साफ न होणे इ. लक्षणे दिसून येतात.

गॅस्ट्रिक ॲसिड तयार करण्याचे सिग्नल मेंदूकडून व्हेगस या परांतुकंपी चेतासंस्थेचा भाग असलेल्या चेतापेशीकडून जठराला दिले जाते. यामुळेच मानसिक असंतुलन जसे की डिप्रेशन, चिंतातूर स्वभाव, घाबरट स्वभाव असलेल्या व्यक्तींमध्ये ॲसिडिटीचे प्रमाण खूपच जास्त असते.

**लक्षणे** :- १. पोट फुगल्यासारखे पाटणे. २. छातीत जळजळ होणे. ३. मळमळणे व उलट्या होणे. ४. ढेकर येणे. ५. पोटात दुखत राहणे. ६. डोके दुखणे. ७. अस्वस्थपणा जाणवणे.

**कारणे** :- १. ५० ते ७० टक्के लोकांमध्ये ॲसिडिटीचे कारण निश्चितपणे समजून येत नाही. २. काही लोकांमध्ये गॅस्ट्रोनंतर जंतुसंसर्गामुळे असा त्रास उद्भवत राहतो. ३. मानसिक ताणतणाव, जठराच्या क्रिया मंदावल्यामुळे बराच काळ अन्न पोटात साठून राहिल्यामुळे अशी ॲसिडिटी उद्भवू शकते. ४. गॅस्ट्रोइसोफेजिअल रिफलक्स डिसिज, जठरातील अल्सर, पोटाचा कॅन्सर, अन्ननलिकेचा कॅन्सर, लहान व मोठ्या आतड्यांचे विकार वैगेरे आजारांमुळेही ॲसिडिटी निर्माण होऊ षकते. ५. भूक नसतानाही अतिप्रमाणात अन्नसेवन करणे, आहारात स्निग्ध पदार्थांचा जास्त वापर असणे, मद्यपान व कॉफीचे व्यसन, भेसळयुक्त अन्नपदार्थ, कीटकनाशकांचा बेसुमार वापर, कृत्रिम खतांचा अनावश्यक वापर, दुधाचा अनावश्यक वापर यामुळे ॲसिडिटी होते. पित्ताशयातील खडे, स्वादुपिंडदाह, यकृतदाह, किडनीचे कार्य बिघडल्यामुळेही पित्ताच्या तक्रारी जाणवतात. ६. वेदनाशामक, प्रतिजैविकांचा अतिप्रमाणात वापर, त्याचबरोबर बऱ्याच काही औषधांमुळे ॲसिडिटी होते. ७. सिस्टेमिक आजार जसे की हृदय धमण्यांचे आजार, मधुमेह, थायरॉइडचे विकार, किडनीचे आजार यामुळेही ॲसिडिटी होते.

धोकादायक लक्षणे : वजन घटणे, अनेमिआ, उलट्या होणे, संडासावाटे रक्त जाणे, अन्न गिळताना त्रास होणे, जुनाट ॲसिडिटीमुळे जठराला अन्ननलिकेला सूज येणे त्यामुळे अन्ननलिकेच्या हालचाली मंदावतात. अन्ननलिकेला व जठराला सूक्ष्म व्रण पडतात.

**निदान** :- वय वर्षे ५५ पेक्षा कमी असलेल्या व्यक्तींमध्ये लक्षणांवरून आधारितच उपचार केले जातात. परंतु, ५५ पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तींमध्ये इन्डोस्कोपी करून ॲसिडिटीचे कारण शोधले जाते.

**पित्तनाशक औषधांच्या वापराचे दुष्परिणाम** :- १. ज्या पित्तनाशक औषधांमध्ये मॅग्नेशिअम असते त्यांना जुलाबाच्या तक्रारी होतात. २. ज्या पित्तनाशक औषधांमध्ये ॲल्युमिनिअम व कॅल्शिअम असते त्यांना बद्धकोष्ठतेच्या तक्रारी होतात. ३. कॅल्शिअम असलेल्या गोळ्यांमुळे किडनी स्टोन होऊ शकतो. कॅल्शिअमचे प्रमाण कमी होऊन हाडे ठिसूळ होतात.

**ॲसिडिटी होऊ नये म्हणून काय करावे?**

१. सतत चांगल्या कामात मग्न राहावे. २. योगासने, प्राणायाम, चालणे नियमितपणे. ३. टी.व्ही., वर्तमानपत्राला कमीत कमी वेळ देणे. ४. कमीत कमी ६ ते ८ तास झोप घेणे. ५. रात्री उशिरा जेवणे टाळावे. ६. तेल, तूप, मसाल्यांचा अनावश्यक वापर टाळावा. फास्टफूडचा वापर टाळावा. स्लो पण स्टेडी फूडचा वापर करावा.

जगातील कोणताही प्राणी तेलतुपाचा, मसाल्याचा आधार न घेता वनस्पतीजन्य किंवा प्राणिजन्य नैसर्गिक आहार तसेच दुसऱ्याचे दूध न चोरता आपले जीवन आनंदात जगत असतात. अति शिजवलेले, अति तळलेले अन्नपदार्थ शरीरास त्रासदायक असतात. त्यामुळेच जठर रसाचे संतुलन बिघडते.

**केस** -

ही एका ३२ वर्षे महिलेची केस आहे जिला जुनाट ॲसिडिटीबरोबरच मायग्रेन व सायनुसायटिसचा त्रास आहे. वरील तक्रारींमुळे त्यांना सतत अस्वस्थ वाटत असे व चिडचिड होत असे. पर्यायी सर्व औषधे घेऊनदेखील तिला स्वस्थ वाटत नव्हते. त्यामुळे वैतागून जाऊन त्यांनी होमिओपॅथिक औषध सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**तक्रारी** :- १. जुनाट ॲसिडिटीचा त्रास तीन वर्षांपासून - मळमळणे, छातीत जळजळ होऊन अस्वस्थपणा जाणवणे, सकाळी उठल्यानंतर, उन्हाळ्यात, बाहेरील अन्नपदार्थ, तेलकट पदार्थ, दूध व दुधाचे पदार्थ इ. मुळे ॲसिडिटी होणे. थंड पदार्थ घेतल्यानंतर, आराम केल्यानंतर बरे वाटणे. ॲसिडिटीनंतर अशक्तपणा जाणवणे.

**२. जुनाट बद्धकोष्ठतेचा त्रास** - पडसाकडला जोर द्यावा लागणे. बाळंतपणानंतर तक्रारींमध्ये वाढ. व्यायामानंतर तक्रारी कमी होणे. ३. अर्धशिणीचा त्रास ३ ते ४ वर्षांपासून - ठणक बसल्यासारख्या वेदना डोळ्यापासून डोक्याच्या मागच्या भागापर्यंत होणे. थंड वाऱ्यामुळे, आवाजामुळे, मानसिक ताणतणावानंतर सकाळी डोके दुखणे. दाबल्यानंतर, चोळल्यानंतर, मोकळ्या वाऱ्यात बरे वाटणे. ४. योनीमार्गे स्राव होणे - मासिकपाळीच्या आधी अंगावरून पांढरट, चिकट स्राव वाहणे. योनीमार्गात खाज येणे, त्या भागातील त्वचेवर पांढरट पावडरसारखी त्वचा खाजवल्यानंतर पडणे. रात्रीच्या वेळी, खाजवल्यानंतर, संबंधांनंतर घामानंतर तक्रारींमध्ये वाढ.

**विशेष माहिती** :- १. खाण्यात तिखट पदार्थांची आवड, दुधाची नावड. २. दूध व तेलकट पदार्थांनी तक्रारी वाढणे. ३. जुनाट सायनसच्या त्रासामुळे वास न समजणे. ४. घामास दुर्गंधी. ५. स्वस्थ झोप न लागणे. भीतिदायक स्वप्न पडणे. ६. मासिक पाळीच्या आधी स्तनामध्ये वेदना होणे. स्वभाव चिडचिडा होणे. ७. थंड प्रकृती.

**स्वभाव :- तुमच्या ताणतणावांविषयी सांगा.**

माझं लग्न ८ वर्षांपूर्वी झाले. लग्नापूर्वी माझा स्वभाव मनमिळाऊ व ध्येयवादी होता. मी एक ब्युटिशियन आहे. मला माझे स्वतःचे ब्युटीपार्लर सुरू करायचे होते. परंतु, माझे पती खूप रागिष्ट व कठोर स्वभावाचे आहेत. ते मला माझा व्यवसाय सुरू करायला परवानगी देत नाहीत. मला माझ्या मनाप्रमाणे कुठल्याच गोष्टी करायला मिळत नाहीत. त्यामुळे आमच्यात सतत वादविवाद होत राहतात. पण, मी शेवटी सांभाळून घेते. त्यांच्या या स्वभावाचा मला राग येतो. पण मी तो व्यक्त करू शकत नाही.

मला खोट बोललेलं, चिडवलेलं सहन होत नाही. मला कुणी थोडतरी वाईट बोललं तर पटकन रडू येतं. कोणीतरी सांत्वन केल्याशिवाय मला बरं वाटत नाही.

**तुम्हाला भीती कशाची वाटते?**

मला अंधाराची, एकटं राहण्याची, कोणी ओरडेल याची भीती वाटते.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व** :- १. दबला गेलेला स्वभाव. २. पटकन रडू येण्याची वृत्ती. ३. दबला गेलेला राग. ४. एकटेपणाची भीती. ५. दूध व स्निग्ध पदार्थांनी ॲसिडिटीचा त्रास होणे. ६. अर्धशिणीचा त्रास. ७. डोळ्यापासून वेदना सुरू होऊन मस्तिष्कापर्यंत जाणे. ८. सकाळच्या वेळी त्रास जास्त होणे. ९. योनीदाह व स्राव. १०. मानसिक ताणतणावांमुळे मासिकपाळीच्या आधी लक्षणांना सुरुवात होणे. ११. शरीराला दुर्गंधयुक्त घाम येणे. १२. थंड प्रकृती.

प्रतिसाद:- त्यांच्या सर्व तक्रारींना सुरुवात बाळंतपणानंतर सुरू झालेल्या कामाच्या ओढाताणामुळे व कौटुंबिक नैराश्यवादाने झालेली होती. वरील सर्व लक्षणांशी साधर्म्य असलेले एकच होमिओपॅथिक औषध मी त्यांना सुरू केले व १५ दिवसांनी फेरतपासणीस बोलावले. फेरतपासणीत त्यांनी सांगितले की, तेलकट व बाहेरचे पदार्थ खाऊनदेखील त्यांना छातीत जळजळ झाली नाही. पडसाकडला व्यवस्थित होऊ लागली. झोप स्वस्थ लागू लागली. योनीमार्गातील खाज व स्राव कमी झाला. आणखीन १५ दिवसांनी त्यांना फेरतपासणीसाठी बोलावले. त्या वेळेस त्या अतिशय हसतमुख वाटल्या. त्यांना पुन्हा ॲसिडिटी व अर्धशिणीचा त्रास झाला नाही.

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
हनुमान मंदिराजवळ, स/नं. ३०९/१/२, शिवाजी चौक, पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९

## लायन्सच्या शताब्दीनिमित्त 'शांती मशाल'

**। पुणे : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय लायन्स क्लबच्या शताब्दीनिमित्त राज्यपाल विद्यासागर राव यांनी सोमवारी लायन्स क्लबतर्फे आयोजित शांती मशाल परिक्रमेला राजभवन येथे झेंडा दाखवून रवाना केले.

लायन्स क्लबच्या सेवाकार्याचे कौतुक करताना देशातील अधिकाधिक दृष्टीहिनांना दृष्टी प्रदान करण्यासाठी लायन्स क्लबने प्रयत्न करावे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. येत्या तीन वर्षांत युवक, दृष्टिहीन, आपत्तीग्रस्त, अपंग, गरीब तसेच इतर १०० दशलक्ष गरजू लोकांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प लायन्स क्लबने सोडला असल्याचे माजी नगरपाल तसेच लायन्स इंटरनॅशनलचे माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष अशोक मेहता यांनी सांगितले. कार्यक्रमाला लायन नरेश अगरवाल, नेविल मेहता, नरेंद्र भंडारी, जयराम सोनपर आदी उपस्थित होते.

## परिपक्व लोकशाहीसाठी कर्तव्ये महत्त्वाची : बच्चू कडू

**। पिंपरी : प्रतिनिधी**

परिपक्व लोकशाहीसाठी नागरिकांची कर्तव्ये महत्त्वाची असून, संकुचित मानसिकता न ठेवता एक जबाबदार नागरिक म्हणून भोवतालच्या सामाजिक वास्तवाचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. तसेच समाजाने मला काय दिले, यापेक्षा अनावश्यक गोष्टी टाळून मी समाजाला काय देऊ शकतो यासाठी प्रयत्न करावा, असे स्पष्ट मत प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेचे बच्चू कडू यांनी व्यक्त केले.



मानव कांबळे यांना प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेचे बच्चू कडू यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नमस्कार प्रकाशनच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे यांना त्यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

स्वराज अभियानचे महाराष्ट्र अध्यक्ष मानव कांबळे म्हणाले, पुरस्काराने प्रेरणा घेऊन समाजकार्यात उतरलेल्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे तरुणांना पुरस्कार देण्यात यावेत. भारतीय संविधानाने महिला-पुरुषांना समान अधिकार दिले. त्यामुळे महिलांनी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संघटित व्हावे. उद्योजक देवानंद गुप्ता, सतीश झांब्रे, सतीश आचार्य, स्वप्नील रोकडे, सुधीर आवळे, पुणे महानगरपालिकेचे अभियंता डी. जी. शिकलगार, बचतगट संघटिका नीलिमा कोल्हे, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर पवार, राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती कराटेपटू श्रुती मोरे, आझम पानसरे सोशल वेलफेअर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष झिशान सय्यद यांनाही यावेळी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी स्वागताध्यक्ष माजी उपमहापौर राजू मिसाळ, उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष सुहास जोशी, अध्यक्ष सलीम शिकलगार, विघ्नहरी देव महाराज, प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

महोत्सवादरम्यान ८९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष पी. डी.पाटील, शरद इनामदार, खासदार अमर साबळे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. आठवडाभर संगीतरजनी, नाटक, कथाकथन, कवी संमेलन, एकपात्री अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळाली.

## बनावट गुणपत्रिका देणाऱ्या कॉलेजवर कारवाई

**। पुणे : प्रतिनिधी**

पैशांच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांना देशातील विविध विद्यापीठांची बनावट प्रमाणपत्रे आणि गुणपत्रिका देणाऱ्या कॉलेजवर गुन्हे शाखेच्या प्रॉपर्टी सेलने कारवाई केली. याप्रकरणी दोन महिलांना अटक केली असून त्यांच्याकडून संबंधित विद्यापीठांचे बनावट शिक्के व कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

परविन विनयपाल सिंग (वय ५०, रा. कृष्णा अपार्टमेंट, पनवेल) आणि उज्वला सतीश कामत (वय ४०, रा. उत्तमनगर, ता. हवेली) अशी आरोपी महिलांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याचा गुन्हा लष्कर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी लष्कर भागातील महात्मा गांधी रस्त्यावरील विजय अशोक कॉम्प्लेक्समध्ये सरस्वती कॉलेज नावाने डिस्टन्स एज्युकेशन देणारी संस्था सुरू केली होती. आरोपी परविन ही या संस्थेची समन्वयक म्हणून काम करीत होती. तर आरोपी कामत त्याठिकाणी नोकरी करीत होती. त्यामध्ये स्थानिक विद्यार्थ्यांकडून मोठ्या स्वरूपात रोख रक्कम स्वीकारून त्यांना वेगवेगळ्या विद्यापीठांची प्रमाणपत्रे व मार्कलिस्ट देण्यात येत आहेत, अशी माहिती गुन्हे शाखेच्या प्रॉपर्टी सेलच्या प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुषमा चव्हाण यांना मिळाली होती. त्यानुसार सदर कॉलेजवर छापा टाकण्यात आला. त्यामध्ये इयत्ता दहावी, बारावी व पदवी उत्तीर्ण झाल्याचे बनावट गुणपत्रिका व प्रमाणपत्र आढळून आली.

छोटे अंग निराश का

जपानी पट्टीनुमा Vaccum Therapy
अंगाचा आकार आणि सेक्स पावरमध्ये वाढ शक्य
FDA चेसुद्धा मानने आहे की VACCUM THERAPY आणि आयुर्वेदिक औषधींद्वारा तुम्ही तुमच्या अंगाच्या आकारात वाढ करुन सेक्स क्षमता वाढवू शकता. शीघ्रपतन, नपुंसकता, अंगाचा लहाणपणा, पातळपणा, वाकडेपणा दूर करुन सुडौल आणि मनासारखा सेक्स टाईम मिळवू शकता. ३० दिवसाच्या औषधीसोबत १६ जीबी मेमरी कार्ड मोफत. NO SIDE EFFECT
09178726578
09090549912

जगातील सर्वश्रेष्ठ सिकंदरे आज़म
भारतात सेक्स पावर कॅप्सूल उपलब्ध
नविन विश्वास, एकाच कॅप्सूलने इंद्रियात अविश्वसनीय वाढ व स्फुर्ती नसांची खराबी, शीघ्रपतन, स्वप्न दोष, नपुंसकता दूर करा. मनासारखा सेक्स टाईम मेडीकल स्टोअरमधून खरेदी करा वा फोन करा.
09212358677
09311303434



Ayurex-Ndx
त्वरित व्हा असरदार स्टॅमिना
साठी आयुर्वेदीक कॅप्सुल
एक कॅप्सुल एक तास आधी
कृपया अविवाहीत पुरुषांनी ह्याचा वापर करू नये.
आयुरेक्स एनडीएक्स सर्व मेडीकल स्टोर्स मध्ये उपलब्ध.

Govt Reg.No.7342
पेन केअर सेंटर
मुंबई, पुणे, नगर, नाशिक, औरंगाबाद
विना ऑपरेशन विना दुष्परिणाम
जॉईंट ॲण्ड स्पाईन


पेन मोड्युलर इंजेक्शन थेरेपी
या पध्दतीमध्ये काही विशिष्ट बिंदुना इंजेक्शन देऊन नसावरील दाब, सुज कमी करण्यात येते. ही पध्दत ज्यांना कमरेचे किंवा मानेचे ऑपरेशन सांगितले आहे ते टाळण्यासाठी एक वरदान ठरले आहे. या इंजेक्शन व्दारे सांध्याचे ल्युब्रीकेशन वाढुन सांधे बदलण्याचे ऑपरेशन टाळता येतात. या पध्दतीमुळे सांधेवातासाठी लागणाऱ्या गोळया ९० टक्यांपर्यंत कमी करता येतात. या इंजेक्शनचे कोणतेही साईड इफेक्ट नाहीत.
अत्याधुनिक अल्टरनेटीव्ह, हायटेक उपचार
जॉईंट ल्युब्रीकेशन थेरेपी (वेळ - स.८ ते दु. ३)
पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार
मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी सेक्स तज्ञांचा सल्ला व आयुर्वेदिक औषधी उपलब्ध

हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,
मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
अॅझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला,डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
औषधीसाठी. संपर्क - 7769856821

## श्रीनाथ म्हस्कोबांचा जन्मोत्सव साजरा

**। परिंचे : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र वीर येथे कालाष्टमीनिमित्तने श्रीनाथ म्हस्कोबा देवांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. पहाटे चार वाजून तीस मिनिटांनी पहाट पुज होऊन मुख्य गाभारा बंद करण्यात आला. सकाळी सहा वाजता दर्शनासाठी गाभारा खुला झाला.

सकाळी देवस्थान ट्रस्ट व भाविकांचे अभिषेक करण्यात आले. जन्मोत्सवनिमित्ताने अभिषेक करण्यात आला. जन्मोत्सवनिमित्ताने मंदिरावर व गाभा-यात शाम गाडे यांच्या वतीने फुलांची सजावट करण्यात आली होती. दिवसभरात वीस हजारांवर भाविकांनी श्रीनाथ म्हस्कोबा व जोगेश्वरीमाता यांचे दर्शन घेतले.

जन्मोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ज्ञानेश्वर काळे (काळेवाडी) यांनी सकाळी व राजेंद्र कटके (चांबळी) यांच्या वतीने रात्री महाप्रसाद देण्यात आला.

भावी काळात देवांच्या लग्नसोहळयासारखा जन्मोत्सव सोहळा साजरा करणार असल्याचे देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष धुमाळ व सचिव तय्यद मुलाणी यांनी सांगितले जन्मोत्सवानंतर रात्रभर मंदिरात समस्त ग्रामस्थ मंडळी वीर यांचे भजन सुरू होते.